# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १७/०९/२०२४ (मंगळवार) दुपार**

## तलवारीने केक कापणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. पारशिवनी हद्दीतील पातीमाता मंदिराचे मागे, खारी पारशिवनी येथील राहणारे नंदकिशोर आनंदराव मस्के याचा दिनांक १४/०९/२०२४ रोजी वाढदिवस असल्याने वाढदिवसाचे अनुषंगाने ठेवलेल्या कार्यक्रमात नंदकिशोर आनंदराव मस्के व त्याचा भाऊ गौरव आनंदराव मस्के या दोघांनी एका मोठ्या लोखंडी तलवारीने केक कापले व त्याचा मोबाईलवर व्हीडीओ तयार करून घेऊन तो व्हीडीओ WhatsApp Status वर ठेवले होते, असे निदर्शनास आल्याने पोलीस निरीक्षक राजेश थोरात पो.स्टे. पारशिवनी यांनी घटनेची दखल घेता पोउपनि भताने, पोहवा मुदस्सर जमाल, पो.शि वीरेंद्रसिंग चौधरी, पोशि राकेश बंधाटे व चापोहवा संदीप बळेकर यांचे पथक नेमून ते मौजा पारशिवनी प्रभाग क्र. १० येथील नंदकिशोर मस्के याचे राहते घरी जावून त्याचेकडे विचारपूस केल्यावर त्याने दिनांक १४/०९/२०२४ रोजी त्याचा वाढदिवस असल्याने त्याने तसेच त्याचा भाऊ नामे गौरव आनंदराव मस्के या दोघांनी आळीपाळीने त्यांच्याकडे असलेली एका मोठ्या लोखंडी तलवारीने केक कापले होते, अशी कबुली दिल्याने त्याचे कडून एक लाल रंगाचे कव्हर मध्ये ठेवलेली व लाकडी मुठ असलेली लोखंडी तलवार जप्त करण्यात आली आहे.

सदर कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग श्री. रमेश बरकते यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन, पारशिवनीचे ठाणेदार राजेशकुमार थोरात, पोउपनि शिवाजी भताने, पोहवा मुदस्सर जमाल, पोअं विरेंद्रसिंग चौधरी, राकेश बंधाटे, पृथ्वीराज चौहान, चालक संदीप वळेकर यांचे पथकाने पुर्ण केली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर